शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीआरपी-११०७/ २३३५/ प्र.क्र.५५५/ पोल-७, दिनांक १३.०२.२००९, हा रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक पोप्रमा-०२१८/प्र.क्र.९४/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक १७ मे २०१८.

वाचा :-
1. १) शासन निर्णय, गृह विभाग, क्र सीआरपी-११०७/ २३३५/ प्र.क्र.५५५/ पोल-७, दिनांक १३.०२.२००९.
2. २) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ नागोठाणे-पो.ठा.प्र.इमा./ रायगड/ ३५२/ २०१७, दिनांक १९.१२.२०१७.
3. ३) अनौपचारिक संदर्भ, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. १२७/ इमा-२, दिनांक १३.०३.२०१८.

प्रस्तावना.-

पोलीस अधीक्षक, रायगड, यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, नागोठाणे, तालुका-रोहा, जिल्हा-रायगड, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग, क्र सीआरपी-११०७/ २३३५/ प्र.क्र.५५५/ पोल-७, दिनांक १३.०२.२००९ व्दारे रु.५०,७१,२२५/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. हे खर्चाचे अंदाज सन २००७-०८ च्या जिल्हा दरसूचीवर आधारित होते. उक्त कामासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाच्या दिनांक २७.०४.२००९ रोजीच्या पत्राव्दारे रु.२४ लक्ष आणि दिनांक १६.०९.२०११ रोजीच्या पत्राव्दारे रु.२६.७२ लक्ष, असे एकूण रु.५०,७२,०००/- इतका निधी उपलब्ध करण्यात आला होता. उक्त निधी पोलीस अधीक्षक कार्यालयाने तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, यांच्याकडे दिला होता. तथापि, उक्त काम अजून सुरु करण्यात आले नाही.

२. पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक १९.१२.२०१७ रोजीच्या संदर्भाधीन पत्राव्दारे पोलीस ठाणे, नागोठाणे, याच्या प्रशासकीय इमारतीचे विद्युतीकरण करण्यासाठी रु.६,९१,०३५/- इतक्या अतिरिक्त खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

३. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील परिच्छेद २६२ अनुसार बांधकामाला दिलेली प्रशासनिक मान्यता ती दिल्याच्या तारखेपासून पाच वर्षाच्या कालावधीनंतर अंमलात राहत नाही. पोलीस ठाणे, नागोठाणे याच्याकरिता नवीन प्रशासकीय

इमारतीचे बांधकाम करण्यासाठी दिनांक १३.०२.२००९ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. उक्त तारखेपासून पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाल्याने उक्त परिच्छेद २६२ मधील तरतूद विचारात घेऊन शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय.-

शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीआरपी-११०७/ २३३५/ प्र.क्र.५५५/ पोल-७, दिनांक १३.०२.२००९, याव्दारे, रद्द करण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२७/ इमा-२, दिनांक १३.०३.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५१८१५०१५१८२२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.05.18 15:00:03 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
३) पोलीस अधीक्षक, रायगड, मुक्काम-अलीबाग.

प्रत:-

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, जिल्हा-रायगड.
२) जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).